# <u>दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह</u>

## 3. <u>निर्णय प्रक्रियेची कार्यपध्दती</u>

उप आयुक्त / अतिरिक्त आयुक्त / मनपा आयुक्त यांना संबंधित विभागाच्या अधिका-यामार्फत उदा. लेखा विभाग, अभियांत्रिकी विभाग, विधि विभाग इ. विषयानुसार तसेच विषयाच्या व्याप्तीनुसार प्रस्ताव पाठविण्यात येतात. उप आयुक्त / अतिरिक्त आयुक्त / मनपा आयुक्त हे संबंधित प्रकरणानुसार निर्णय घेत असतात.

निर्णय प्रक्रियेच्या कार्यपध्दतीमधे पुढे नमूद केलेल्या अधिका-यांचे अभिप्राय घेतले जातात.

अ) वित्त : लेखा अधिकारी (के/पूर्व) / उप प्रमुख लेखापाल (प. उप )/ प्रमुख लेखापाल

ब) विधि : विधि अधिकारी

क) आस्थापना : उप प्रमुख कर्मचारी अधिकारी / प्रमुख कर्मचारी अधिकारी

ड) यांत्रिकी व विद्युत : कार्यकारी अभियंता (यां.व वि.)प.उप. / प्रमुख अभियंता(यां. व वि.)

इ) वातानुकूल यंत्रणा : कार्यकारी अभियंता (प्रशितन ), मनपा कार्यशाळा

फ) परिरक्षण : कनिष्ठ अभियंता / दुय्यम अभियंता / सहाय्यक अभियंता परिरक्षण (के/पूर्व)

सक्षम अधिका-यांनी घेतलेले निर्णय प्रशासकीय अधिकारी / उप आयुक्त यांच्याकडून लेखी स्वरुपात टपालाने / कुरीयरने पत्र पाठवून किंवा सूचना फलकावर प्रदर्शित करुन कळविले जातात.

ज्याबाबत निर्णय घेण्यात आलेले आहेत अशा महत्वाच्या विषयांबाबत माहिती.

| अनु.क्र | 1 |
|---|---|
| निर्णय घेण्यात आलेला विषय | शुल्क सूची |
| मार्गदर्शक तत्वे / सूचना असल्यास | उत्पन्न आणि खर्च विचारात घेऊन |
| कार्यान्वित करण्याची पध्दत | सूचना फलकावर प्रदर्शित करुन व संबंधित संस्थांना प्रती पाठवून |
| निर्णय प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिका-याचे पदनाम | उप आयुक्त (आपत्कालिन व्यवस्थापन ) |
| उपरोक्त नाव नमूद केलेल्या अधिका-याचा संपर्क क्रमांक | 23089217 |
| निर्णयाने समाधान न झाल्यास कोणाकडे व कसे अपिल करावे | अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे ) यांचेकडे विहित नमुन्यामध्ये लेखी अर्ज करुन |

| | |
|---|---|
| अनु. क्र. | 2 |
| निर्णय घेण्यात आलेला विषय | कंत्राटे |
| मार्गदर्शक तत्वे / सूचना असल्यास | अटी व शर्ती पूर्ण करीत असलेले लघुत्तम व महत्तम देकार (प्रकरणानुसार) विचारात घेऊन स्विकारले जातात. |
| कार्यान्वित करण्याची पध्दत | संबंधित संस्थाना प्रती पाठवून |
| निर्णय प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिका-याचे पदनाम | उप आयुक्त (आपत्कालिन व्यवस्थापन) |
| उपरोक्त नाव नमूद केलेल्या अधिका-याचा संपर्क क्रमांक | 23089217 |
| निर्णयाने समाधान न झाल्यास कोणाकडे व कसे अपिल करावे | अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे ) यांचेकडे विहित नमुन्यामध्ये लेखी अर्ज करुन |